# मेट्रो ३चे संचालन दिल्ली मेट्रोकडे

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

## 'एमएमआरसी'ने दिले कंत्राट

आरे ते कफ परेड असलेल्या मेट्रो ३ या भूमिगत मार्गिकेचे संचालन दिल्ली मेट्रो रेल महामंडळ (डीएमआरसी) करणार आहे. यासंबंधीचे कंत्राट ही मार्गिका विकसित करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) शुक्रवार, २६ मे रोजी 'डीएमआरसी'ला दहा वर्षांसाठी देण्यात आले.

मेट्रो ३ ही राज्यातील पहिली भुयारी मेट्रो मार्गिका आहे. मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडणारी ही मार्गिका उत्तरेकडे आरे, तर दक्षिणेकडे कफ परेड अशी आहे. मार्गिकेवर एकूण २६ स्थानके भूमिगत व एक स्थानक जमिनीवर आहे. या एकूण ३३.५ किमी लांबीच्या मार्गिकेसाठी ३३ हजार कोटी रुपये खर्च येणार आहे. त्यासाठी १२ हजार ७५० कोटी रुपयांचे कर्ज जपानी आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेकडून मिळाले आहे. या मार्गिकेतील आरे ते बीकेसी हा १० स्थानकांचा पहिला टप्पा डिसेंबरपर्यंत सुरू करण्याचे सरकारचे लक्ष्य आहे. त्यानुसार मार्गिकेची उभारणी जोमाने सुरू असताना, आता मार्गिका सुरू झाल्यानंतर संचालनासंबंधी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

मेट्रो ३ मार्गाच्या संचालन आणि देखभालीचे कंत्राट 'डीएमआरसी'ला दिले आहे. हे कंत्राट दहा वर्षांसाठी असेल. त्या अंतर्गत कंत्राटदाराला संचालन नियंत्रण केंद्रे, डेपो नियंत्रण केंद्र, स्थानके, गाड्यांचे वेळापत्रक, प्रणाली व्यवस्थापन व प्रवासी सुरक्षेसह दैनंदिन कामकाज पाहावे लागेल, असे 'एमएमआरसी'ने म्हटले आहे. 'डीएमआरसी हे देशातील अग्रगण्य मेट्रो ऑपरेटिंग कंपन्यांपैकी एक आहेत. कोणत्याही मेट्रोसाठी ऑपरेशन आणि मेंटेनन्स हा महत्त्वाचा घटक असतो. आम्ही प्रवाशांना किफायतशीर मार्गाने, आकर्षक आरामदायक, सुरक्षित, विश्वासार्ह व उच्च दर्जाची सेवा देण्यास वचनबद्ध आहोत', असे 'एमएमआरसी'च्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले.